## आजचे पंचांग

बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष, नवमी रात्री २-४१ पर्यंत नंतर दशमी तिथी, दिवस नक्षत्र- रोहिणी दुपारी १-३९ पर्यंत नंतर मृग, योग- विष्कंभ रात्री १-२९ पर्यंत नंतर प्रीति, करण- बालव दुपारी ३-४७ पर्यंत नंतर कौलव

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## इराणमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन

**इराण** : इराणमध्ये 40 दिवसांच्या दडपशाहीनंतर विद्यार्थ्यांचे पुन्हा निदर्शने सुरू झाली आहेत. शनिवारी तेहरान आणि मशहद येथील विद्यापीठांमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. मागील महिन्यातील हिंसाचारानंतर शरीफ युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, अमीरकबीर युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि दोन्ही शहरांतील अनेक वैद्यकीय विज्ञान विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांनी रॅली काढल्या. या निदर्शनांमध्ये 'हुकूमशाहचा मृत्यू व्हावा' आणि सरकारविरोधी घोषणा देण्यात आल्या.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 बुधवार, दि. २५ फेब्रुवारी, २०२६ वर्ष - १ अंक - १५३ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### धर्मांतर आणि बलात्काराच्या गुन्ह्यानं खळबळ

**भोपाळ :** मध्यप्रदेशातील भोपाळ जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या तक्रारींच्या तपासातून धक्कादायक प्रकरण उघड झाले आहे. छत्तीसगडच्या २१ वर्षीय तरुणी आणि भोपाळमधील ३० वर्षीय महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी सेक्स आणि जबरदस्ती धर्मांतराचे रॅकेट उघडकीस आणले. नोकरीचे आमिष दाखवून अंमली पदार्थ देत अत्याचार व धर्मांतराचा दबाव टाकल्याचा आरोप आहे. पोलिसांनी आफरीन आणि अमरीन या दोन सख्ख्या बहिणींना अटक केली असून इतर तिघांचा शोध सुरू आहे.

### युवा काँग्रेस अध्यक्षांसह आठ जण अटकेत

**नवी दिल्ली :** दिल्लीमध्ये गेल्या आठवड्यात पार पडलेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'दरम्यान २० फेब्रुवारी रोजी झालेल्या आंदोलनाप्रकरणी दिल्ली पोलिसांनी युवा काँग्रेसचे अध्यक्ष उदय भानू चिब यांच्यासह संघटनेच्या आठ सदस्यांना अटक केली. सोमवारी चौकशीसाठी ताब्यात घेतल्यानंतर मंगळवारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायदंडाधिकाऱ्यांनी सर्व आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

### तलावात पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील हंबरपाडा ग्रामपंचायत हद्दीतील तुंगी गावात जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या तलावाच्या कामात १२ वर्षीय ओंकार उर्फ मुक्या आसवले याचा दुर्दैवी मृत्यू झाला. तलावात सुमारे १५ फूट पाणी साचलेले असतानाही कोणतेही सुरक्षा कठडे, इशारा फलक किंवा संरक्षक जाळी नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. डोंगराळ व निसरड्या परिसरात सुरू असलेल्या खोदकामामुळे धोका वाढल्याचे सांगितले जात आहे.

## मराठा- कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेला वेग देण्याचा प्रयत्न

# हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणीसाठी नवी समिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी (कुणबी) प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र तब्बल सहा महिन्यांनंतरही यासाठी आवश्यक असलेली स्पष्ट कार्यपद्धती निश्चित न झाल्याने प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला अपेक्षित वेग मिळालेला नाही. आता या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नवी समिती स्थापन केली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीचे अध्यक्ष विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर असणार आहेत. संबंधित समिती हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे पात्र व्यक्तींना कुणबी अथवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सविस्तर आणि स्पष्ट कार्यपद्धती तयार करणार आहे. ही कार्यपद्धती अंतिम झाल्यानंतर ती राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. मंजुरीनंतरच प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला गती मिळेल, अशी माहिती अधिकृत आदेशातून देण्यात आली आहे.

सरकारनेच आदेशात मान्य केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे अर्जांची संख्या कमी आहे आणि प्रमाणपत्रांचे वाटपही अत्यल्प प्रमाणात झाले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये समोर आलेल्या आकडेवारीनुसार, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतून केवळ ५९४ अर्ज दाखल झाले. त्यापैकी अवघ्या ९८ जणांना ओबीसी प्रमाणपत्र मिळाले. तीन महिन्यांत इतक्या कमी प्रमाणात प्रमाणपत्रे वितरित झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने आंदोलनानंतर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात कार्यपद्धतीच निश्चित न झाल्याने प्रक्रिया रखडली. त्यामुळे ही दिरंगाई प्रशासनाची उदासीनता तर नाही ना, असा सवाल राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून उपस्थित होत आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या विलंबाबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणीही होत आहे. दरम्यान, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी समितीमार्फत कार्यपद्धती लवकरात लवकर निश्चित केली जाईल, असे संकेत दिले आहेत.

## विधानसभेत 11,995 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 23 फेब्रुवारी म्हणजेच कालपासून सुरु झालं आहे. आज राज्य सरकारच्यावतीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत 11,995 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. तर, राज्य सरकारच्या या निर्णयावर काँग्रेस नेत्यांनी टीका केली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन ऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे, असा सल्ला देखील महायुती सरकारला दिला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली खात्यावरील एकूण खर्च - 5,748 कोटी रुपये तर भांडवली खात्यावरील खर्च 6003 कोटी रुपये आहे. या पुरवणी मागण्यांमधील प्रमुख तरतुदी म्हणजे कोणत्या खात्यांसाठी आहेत याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे. ऊर्जा आणि उद्योग क्षेत्र: ऊर्जा, कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागासाठी 4,066 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी सर्वाधिक 3262 कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी, तर 803 कोटी रुपये ग्राम आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागासाठी 1431 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागासाठी 71 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नियोजन विभाग: 80 कोटी रुपये.अन्न व नागरी पुरवठा विभाग: 55.52 कोटी रुपये.ओबीसी कल्याण विभाग: 23.64 कोटी रुपये .महसूल आणि वन विभाग: 132 कोटी रुपये,वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग: 31 कोटी रुपये राज्य सरकारकडून प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या जात असल्यानं विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे.

## अल्पसंख्याक विभागाचा खुलासा;'त्या' शाळांना प्रमाणपत्र वाटप झालेच नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल असतानाच मंत्रालयात काही फाईल्स वेगाने फिरल्या आणि राज्यातील तब्बल ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या मृत्यूनंतर घाईगडबडीने ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा का देण्यात आला? यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाला स्थगिती दिली होती. यावर आता अल्पसंख्याक विकास विभागाने खुलासा केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत कोणत्याही नवीन फाईल्सवर किंवा प्रमाणपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, असा खुलासा अल्पसंख्याक विकास विभागाने केला आहे.तसेच त्या दिवशी कोणतेही प्रमाणपत्र वाटप झालेले नसल्याचेही विभागाने नमूद केले आहे. अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्याची संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाईन, पारदर्शक असून २७ मे २०१३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसारच राबवली जाते. अर्जांची जिल्हास्तरावर पडताळणी झाल्यानंतरच छाननी करून प्रमाणपत्रे वितरित केली जातात, असे विभागाने नमूद केले आहे. विभागामार्फत कोणतेही अनधिकृत अथवा घाईघाईने कामकाज झाल्याचे वृत्त पूर्णपणे निराधार आहे.

## रामदास आठवले यांची पुनर्नियुक्ती जवळपास निश्चित; भाजपमध्ये उर्वरित तीन जागांसाठी जोरदार चुरस

# राज्यसभेच्या ७ जागांसाठी रणधुमाळी; महायुतीचे ६, मविआसमोर एकमेव संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई/नवी दिल्ली :** राज्यसभेच्या सात जागांसाठी मार्चमध्ये निवडणूक होणार असून विधानसभेतील संख्याबळ पाहता महायुतीचे पारडे स्पष्टपणे जड मानले जात आहे. सातपैकी सहा जागा सत्ताधाऱ्यांच्या खात्यात जाण्याची शक्यता असून, विरोधी बाकांवर असलेल्या महाविकास आघाडीसमोर केवळ एकच जागा जिंकण्याचे आव्हान आहे. मात्र ती जागा मिळवण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाने एकजूट दाखवणे अत्यावश्यक ठरणार आहे.

**भाजपला चार जागांची संधी**

विधानसभेत भाजपकडे सध्या १३१ आमदार आहेत. काही अपक्ष आणि लहान पक्षांचा पाठिंबा लक्षात घेतल्यास भाजपला चार उमेदवार सहज विजयी करता येऊ शकतात. यातील एक जागा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासाठी राखीव असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे अध्यक्ष असलेले आठवले गेल्या दशकभरापासून भाजपसोबत आहेत. केंद्रातील मंत्रिपद कायम ठेवण्यासाठी राज्यसभेचे सदस्यत्व आवश्यक असल्याने त्यांना पुन्हा संधी दिली जाईल, असा पक्षांतर्गत सूर आहे.

**निष्ठावंतांना प्राधान्य?**

राज्यसभेवरील उमेदवारीबाबत अंतिम निर्णय भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत होणार आहे. वरिष्ठ सभागृहात निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी द्यावी, असा मतप्रवाह पक्षात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र या निकषाला रामदास आठवले अपवाद मानले जात आहेत. दलित समाजात सकारात्मक संदेश देण्यासाठीही त्यांच्या उमेदवारीला प्राधान्य दिले जाणार असल्याचे संकेत आहेत.

२०१४ मध्ये भाजप-रिपाई युती झाल्यानंतर आठवले यांना राज्यसभेवर पाठवण्यात आले. जुलै २०१६ मध्ये त्यांच्याकडे सामाजिक न्याय खात्याचे राज्यमंत्रीपद सोपवण्यात आले. २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकांनंतरही त्यांचे मंत्रिपद कायम राहिले. मार्च २०२० मध्ये राज्यसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर भाजपने त्यांना पुन्हा संधी दिली होती. आता त्यांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपत आहे.

**उर्वरित जागांसाठी चुरस**

आठवले यांची उमेदवारी निश्चित मानली जात असली, तरी उर्वरित तीन जागांसाठी भाजपमध्ये जोरदार चुरस आहे. विनोद तावडे, सुनील देवधर, विनय सहस्रबुद्धे यांची नावे चर्चेत आहेत. तसेच राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांचीही नावे शर्यतीत असल्याचे समजते. दरम्यान, महाविकास आघाडीसमोर एकमेव जागा जिंकण्याचे आव्हान आहे. संख्याबळ कमी असले तरी तिन्ही पक्षांनी रणनीतीपूर्वक एकत्र राहिल्यास त्यांना संधी मिळू शकते. राज्यसभेच्या निवडणुकीतून राज्यातील सत्तासमीकरणांचा आणि पक्षांतर्गत ताकदीचा कस लागणार असून, उमेदवारी जाहीर झाल्यानंतरच चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

# 'भाई' विरुद्ध 'दादा' संघर्ष तीव्र!

## परिवहन समितीच्या वादातून ठाण्यात महायुतीत तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ठाणे :** भाजपचे 'दादा' आणि शिंदेसेनेचे 'भाई' यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा चिघळताना दिसत आहे. नवी मुंबई महापालिकेतील परिवहन समितीच्या सदस्यनिवडीवरून निर्माण झालेला वाद आता ठाणे महापालिकेतही पोहोचला असून, महायुतीतील अंतर्गत तणाव टोकाला जाण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

नवी मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिंदेसेना आमनेसामने आले होते. भाजपचे नेते तथा वनमंत्री गणेश नाईक यांनी प्रभावी कामगिरी करत बाजी मारली, तर शिंदेसेनेनेही लक्षणीय यश मिळवले. मात्र निवडणुकांनंतरही दोन्ही पक्षांतील संघर्ष शमलेला नाही.

ठाणे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे 'होमपीच' मानले जाते. येथे महायुतीने एकत्र निवडणूक लढवत स्पष्ट बहुमत मिळवले असले, तरी समित्यांच्या वाटपावरून दोन्ही पक्षांमध्ये मतभेद वाढत आहेत. विशेषतः नवी मुंबईतील परिवहन समिती सदस्यनिवडीच्या वादाचे पडसाद आता ठाण्यात उमटू लागले आहेत.

**परिवहन समितीवरून ठिणगी**

नवी मुंबईत संख्याबळानुसार परिवहन समिती सदस्यांची निवड अपेक्षित असताना भाजपने स्वतःचेच सदस्य देत आक्रमक भूमिका घेतल्याचा आरोप शिंदेसेनेकडून करण्यात आला. नियमबाह्य कारभाराचा ठपका ठेवत शिंदेसेनेने आक्रमक पवित्रा घेतला.

या पार्श्वभूमीवर ठाण्यातील पहिल्याच महासभेत शिंदेसेनेने भाजपला कोंडीत पकडल्याचे चित्र दिसले. प्रशासकीय काळातील कामकाजासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर महासभेत उत्तरं मिळावीत, अशी भाजपची अपेक्षा होती; मात्र ती मागणी फेटाळण्यात आली. यामुळे दोन्ही पक्षांमध्ये ठिणगी पडली आहे.

**समित्यांच्या वाटपावरून शक्तीप्रदर्शन**

ठाणे महापालिकेत स्थायी समिती, प्रभाग समित्या, परिवहन, शिक्षण आणि सुधार समित्यांच्या सदस्यनिवडीची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. नवी मुंबईत भाजपने घेतलेल्या भूमिकेचा 'उट्टा' ठाण्यात काढण्याची रणनीती शिंदेसेनेने आखल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## १४ वर्षांच्या मुलींसाठी केंद्राची विशेष HPV लसीकरण मोहीम

**पुणे:** भारत सरकार या महिन्याच्या अखेरीस १४ वर्षांच्या मुलींसाठी विशेष HPV लसीकरण मोहीम सुरू करणार आहे, अशी माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील सूत्रांनी दिली. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी ही मोहीम राबवली जाणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या स्ट्रॅटेजिक ॲडव्हायझरी ग्रुप ऑफ एक्सपर्ट्स ऑन इम्युनायझेशनच्या शिफारसीनुसार सरकारने 'सिंगल-डोस रेजिमेन' स्वीकारला आहे. एकाच डोसमुळे लसीकरण अधिक सुलभ, परिणामकारक आणि व्यापक प्रमाणावर राबवणे शक्य होणार असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले.

# दादांची तुमच्या लेखी काहीच किंमत नाही का?

## रोहित पवारांनी व्हीएसआर कंपनीच्या चौकशीवर प्रश्न केला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) नेते आणि आमदार रोहित पवार यांनी झारखंडमधील विमान अपघातानंतर पुन्हा एकदा विमान कंपनी VSR Venturesबद्दल सरकारला गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सोमवारी (२३ फेब्रुवारी) रात्री झारखंडच्या चतरा जिल्ह्यात रांचीहून दिल्लीकडे जाणाऱ्या एअर अँम्ब्युलन्सच्या अपघातात सात प्रवाशांचा मृत्यू झाला. यानंतर रोहित पवारांनी एक्सवर पोस्ट करून श्रद्धांजली अर्पण करत अपघाताच्या चौकशीत गंभीर विसंगती असल्याचा आरोप केला आहे.

रोहित पवार म्हणाले की, "चतरामध्ये झालेल्या अपघातानंतर लगेच केंद्रीय विमान मंत्रालय आणि AAIB कडून Redbird Airways या कंपनीच्या कार्यालयाची तपासणी करण्यात आली. परंतु VSR कंपनीच्या बाबतीत तशी तत्परता का दाखवली जात नाही?" असा संतप्त सवाल त्यांनी केला. ते म्हणाले की जर VSR कंपनीने पुराव्यांसह काम केलं नसतं तर कोण ती कंपनी वाचवत आहे आणि का वाचवत आहे? याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. रोहित पवार यांचा आरोप आहे की उजवा पवारांचा २८ जानेवारी रोजी झालेल्या अपघाताचा तपास पुरेसा पारदर्शक नाही आणि VSR Venturesची चौकशी त्वरित केली पाहिजे. याच कंपनीची Learjet 45 विमानात अजीत पवार आणि इतर प्रवासी होते, जे अपघातात मिळून गेले.

## खासदार संदिपान भुमरे यांच्यावर अंबादास दानवेंचा गंभीर आरोप

# ड्रायव्हरच्या नावे ११५० कोटींचा जमीन घोटाळा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** छत्रपती संभाजीनगरमध्ये समृद्धी महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या व्यवहारावरून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी सत्ताधारी खासदार संदिपान भुमरे यांच्यावर ११५० कोटी रुपयांच्या कथित जमीन घोटाळ्याचा गंभीर आरोप केला आहे. भुमरे यांनी आपल्या चालकाच्या माध्यमातून सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्याचा प्रयत्न केल्याचा दावा दानवे यांनी केला आहे.

**नेमके प्रकरण काय?**

छत्रपती संभाजीनगरमधील जटवाडा परिसरात २३ एकर ३० गुंठे जमीन महाराष्ट्र विकास मंडळाने संपादित केली. या जमिनीला कोणताही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगितले जाते. समृद्धी महामार्गासाठी ही जमीन अधिग्रहित करण्याचे आदेश झाल्यानंतर तिचे संपादन मूल्य तब्बल ११५० कोटी रुपये निश्चित करण्यात आले.

मात्र, मूल्य निश्चित झाल्यानंतर काही व्यक्तींनी अचानक या जमिनीवर मालकी हक्काचा दावा केल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. संबंधितांनी ही जमीन मुस्लिम पद्धतीनुसार 'हिबानामा'द्वारे जावेद रसूल शेख यांच्या नावावर करण्यात आल्याचे कागदोपत्री दाखवले आहे.

**जन्मापूर्वीच जमीन व्यवहार?**

अंबादास दानवे यांनी या व्यवहारातील मोठी तांत्रिक विसंगती अधोरेखित केली आहे. कागदोपत्रीनुसार हा हिबानामा १९७१ मध्ये झाल्याचे नमूद आहे. परंतु ज्या जावेद रसूल शेख यांच्या नावावर जमीन असल्याचा दावा केला जात आहे, त्यांचा जन्म १९८५ मध्ये झाल्याचे दाखले आहेत. म्हणजेच, व्यक्तीच्या जन्माच्या तब्बल १४ वर्षे आधी त्याच्या नावावर जमीन कशी काय करण्यात आली, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला आहे.

**चालकाच्या माध्यमातून डाव?**

दानवे यांच्या आरोपानुसार, जावेद रसूल शेख हे खासदार संदिपान भुमरे यांचे चालक आहेत. त्यांच्या माध्यमातून ११५० कोटी रुपयांचा घोटाळा करण्याचा डाव आखण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, याच चालकाच्या नावावर यापूर्वीही सुमारे ४०० कोटी रुपयांच्या हिबानामा प्रकरणाची चर्चा झाली होती, असा आरोपही त्यांनी केला.

दानवे यांनी म्हटले आहे की, हे सर्व व्यवहार खासदारांच्या आशीर्वादाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडले जात आहेत.

**चौकशीची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, यासाठी अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांना सविस्तर पत्र लिहिले आहे. या प्रकरणाची तातडीने सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली असून, चौकशीतून संपूर्ण सत्य बाहेर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, या आरोपांमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, संबंधितांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. चौकशीनंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## गोदावरीच्या पात्रात सोनं शोधण्यासाठी झुंबड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे नाथषष्ठी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीच्या पात्रातील पाणी कमी करण्यात आल्यानंतर सध्या अनोखे दृश्य पाहायला मिळत आहे. पाणी ओसरल्याने नदीचे विस्तीर्ण पात्र उघडे पडले असून, या गाळामध्ये सोनं मिळेल या आशेने शेकडो नागरिकांनी नदीकाठ गाठला आहे. पहाटेपासूनच महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक हातात चाळण्या, टोपल्या, बादल्या आणि लहान फावड्या घेऊन गाळ चाळताना दिसत आहेत. काही जण गाळ पाण्यात धुऊन बारकाईने तपासत आहेत.

नाथ मंदिर परिसराच्या पाठीमागे असलेल्या दशक्रिया घाटावर वर्षभर अंत्यविधी आणि धार्मिक विधी पार पडतात. स्थानिक श्रद्धेनुसार, विधीवेळी मृत व्यक्तीसोबत अर्पण केलेले सोन्या-चांदीचे दागिने किंवा नाणी नदीत विसर्जित केली जातात. वर्षभर पाण्याखाली राहिलेला हा गाळ पाणी कमी झाल्यानंतर उघडा पडतो आणि त्यातून मौल्यवान धातू मिळण्याची शक्यता व्यक्त केली जाते. काही नागरिकांना किरकोळ धातूचे तुकडे मिळाल्याची चर्चा रंगली असली, तरी बहुतांश जण नशीबाच्या भरवशावर प्रयत्न करताना दिसत आहेत. दरम्यान, नदीपात्रात वाढती गर्दी, खोल गाळ आणि निसरडा परिसर लक्षात घेता सुरक्षेचा प्रश्नही उपस्थित होत आहे. प्रशासनाने आवश्यक खबरदारी घेण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. सोन्याच्या आशेने सुरू झालेली ही झुंबड सध्या पैठण शहरात चर्चेचा प्रमुख विषय ठरली.

# संपादकीय

## ‘प्रहार’ आणि प्रत्यक्ष लढाई



**दहशतवादाविरोधात देशाचे पहिले राष्ट्रीय धोरण जाहीर झाले आहे. ‘प्रहार’ ही केवळ सुरक्षायंत्रणांची मांडणी नाही; ती राज्यसत्तेच्या मनोवृत्तीची परीक्षा आहे. घोषणांच्या गजरात हरवणारे अनेक आराखडे आपण पाहिले आहेत. हा दस्तऐवज त्यांच्यापेक्षा वेगळा ठरणार का, हा खरा प्रश्न आहे.**

दहशतवाद हा भारतासाठी नवा विषय नाही. पंजाबपासून काश्मीरपर्यंत, ईशान्येकडील बंडखोरीपासून शहरी साखळी स्फोटांपर्यंत देशाने अनेक दशके हिंसेचा अनुभव घेतला. प्रत्येक वेळी प्रतिसाद मिळाला. कायद्यांच्या कठोर तरतुदी, विशेष दलांची उभारणी, गुप्तचर जाळ्याचा विस्तार. मात्र हे सारे तुकड्या-तुकड्यांत. एकसंध राष्ट्रीय चौकट नव्हती. ‘प्रहार’ त्या अभावाची पूर्तता करण्याचा दावा करतो. या धोरणाची पहिली वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे प्रतिबंधावर भर. घटना घडल्यानंतर कारवाई करणे ही जुनाट पद्धत. जोखीम आधी ओळखणे, प्रवृत्तींचे विश्लेषण करणे, निधीचे मार्ग रोखणे, डिजिटल प्रचारावर नियंत्रण ठेवणे ही नवी रूपरेषा. दहशतवादाचा चेहरा बदलला आहे. सीमारेषा ओलांडून येणारी घुसखोरी हा एक भाग; परंतु स्थानिक असंतोष, सामाजिक दुरावा, आभासी माध्यमांतील विषारी प्रचार ही तितकीच गंभीर आव्हाने. धोरण त्या सर्वांचा उल्लेख करते. मात्र दस्तऐवजातील शब्द आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांत अंतर असते. दहशतवादविरोधी लढाई केवळ शस्त्रसज्जतेची नसते; ती संस्थात्मक समन्वयाची असते. केंद्र, राज्ये, पोलीस, लष्कर, गुप्तचर संस्था, आर्थिक तपास यंत्रणा यांचा परस्पर संवाद सुसूत्र नसेल तर कोणतेही धोरण कागदावरच राहते. भारताचे संघराज्यीय स्वरूप येथे कसोटीला लागते. सुरक्षा हा विषय अनेकदा राजकीय स्पर्धेचे साधन बनतो. माहितीची देवाणघेवाण, अधिकारांचे वाटप आणि जबाबदाऱ्यांची स्पष्ट रेषा यांची अंमलबजावणी नसेल तर ‘प्रहार’ही घोषणापत्र ठरेल. धोरणात आर्थिक प्रवाहांवर लक्ष केंद्रीत करण्याचा उल्लेख आहे. दहशतवादी कारवायांना निधी पुरवणाऱ्या जाळ्यांवर प्रहार करणे आवश्यक. काळा पैसा, हवाला मार्ग, आंतरराष्ट्रीय देणग्या, बनावट चलन या साऱ्यांचा मागोवा घेणे तांत्रिक कौशल्य मागते. वित्तीय संस्थांचे निरीक्षण आणि गुप्तचर माहिती यांचा संगम साधावा लागतो. येथे पारदर्शकता आणि नागरिकांच्या हक्कांचे संतुलन राखणे तितकेच महत्त्वाचे. सुरक्षा नावाखाली आर्थिक व्यवहारांवर अतिरेकी नियंत्रण आले तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेलाही भोगावे लागतात. डिजिटल क्षेत्र हे आणखी एक रणांगण. सामाजिक माध्यमांतून कट्टरतेचा प्रसार वेगाने होतो. तरुण मनांवर प्रभाव टाकणारे संदेश, विकृत इतिहासकथन, धार्मिक किंवा जातीय तणाव पेटवणारे व्हिडिओ हे सर्व सीमाहीन. त्यावर नियंत्रणासाठी तंत्रज्ञान, कायदा आणि समाजशास्त्रीय समज यांची सांगड आवश्यक. केवळ बंदी घालून प्रश्न सुटत नाही. प्रतिबंधात्मक संवाद, शिक्षण आणि समावेशक विकास यांचा दीर्घकालीन विचार हवा. धोरण या घटकांचा उल्लेख करते; मात्र त्यासाठी लागणारी संसाधने आणि राजकीय इच्छाशक्ती यांचा ठोस आराखडा दिसणे गरजेचे. दहशतवादाचा सामाजिक संदर्भ दुर्लक्षित करता येत नाही. उपेक्षा, बेरोजगारी, स्थानिक तक्रारी, राजकीय प्रतिनिधित्वाचा अभाव या जमिनीवर अतिरेकी विचार अंकुरतात. त्यामुळे सुरक्षा धोरण आणि विकास धोरण यांची सांगड अनिवार्य. प्रभावित भागात पायाभूत सुविधा, शिक्षण, रोजगारनिर्मिती, स्थानिक स्वराज्य संस्थांना बळ या उपाययोजना नसतील तर केवळ पोलिसी कारवाई दीर्घकाळ परिणाम देत नाही. ‘प्रहार’ या दृष्टीने व्यापक चौकट मांडतो; अंमलबजावणीतील सातत्य महत्त्वाचे. आंतरराष्ट्रीय सहकार्याचा उल्लेखही अपेक्षितच. दहशतवादी संघटना सीमा मानत नाहीत. शस्त्रसामग्री, प्रशिक्षण, निधी यांची साखळी अनेक देशांत पसरलेली. माहितीची देवाणघेवाण, संयुक्त कारवाई, प्रत्यार्पण करार या सर्वांमध्ये भारताने सक्रिय भूमिका घ्यावी लागेल. मात्र परराष्ट्र धोरणातील समतोल आणि अंतर्गत सुरक्षेची गरज यांत ताण निर्माण होऊ शकतो. धोरणात्मक स्पष्टता आवश्यक. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नागरी स्वातंत्र्य. दहशतवादविरोधी कायदे अनेकदा कठोर असतात. तपास यंत्रणांना व्यापक अधिकार दिले जातात. त्यांचा दुरुपयोग झाल्यास लोकशाहीची पायाभरणी हादरते. ‘प्रहार’ची खरी कसोटी येथे. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा समतोल राखणे हे परिपक्व राज्याचे लक्षण. न्यायालयीन देखरेख, उत्तरदायित्वाच्या यंत्रणा आणि पारदर्शक प्रक्रिया नसतील तर जनविश्वास ढळतो. दहशतवादाविरोधातील लढाई जनसमर्थनावर उभी असते; भीतीवर नव्हे. राजकीय पातळीवरही संयम आवश्यक. प्रत्येक घटनेनंतर भावनिक प्रतिक्रिया, दोषारोप आणि ध्रुवीकरणाची भाषा परिस्थिती गुंतागुंतीची करते. राष्ट्रीय धोरण हे पक्षनिरपेक्ष असावे. विरोधकांना सामावून घेतले नाही तर सुरक्षेचा प्रश्नही राजकारणाच्या विळख्यात अडकतो. दीर्घकालीन सातत्यासाठी व्यापक सहमती गरजेची. ‘प्रहार’ या नावात आक्रमकता आहे; परंतु प्रत्यक्ष लढाई संयमाची असते. दहशतवादाशी सामना करताना केवळ शत्रूचा नाश हा उद्देश नसतो; समाजातील विश्वास टिकवणे तेवढेच आवश्यक. संस्थात्मक क्षमता, तांत्रिक कौशल्य, सामाजिक समावेशकता आणि राजकीय परिपक्वता या चौकटीतच हे धोरण यशस्वी होऊ शकते. घोषणा महत्त्वाची असते; परंतु इतिहास घोषणांपेक्षा अंमलबजावणीची नोंद ठेवतो. ‘प्रहार’ने दिशा दाखवली आहे.

# भारतीय प्रजासत्ताकाचे निर्णायक वळण

**» भारतीय प्रजासत्ताक एका निर्णायक वळणावर उभे आहे. सत्तेचे केंद्रीकरण आणि वैविध्याचा आग्रह यांतील ताण वाढत असताना दक्षिणेकडील राज्यांनी नव्या संघराज्य कराराची चर्चा पेटवली आहे. हा लढा निव्वळ अधिकारांसाठी नाही; ही लोकशाहीच्या स्वरूपाविषयीची मूलभूत चौकशीही आहे.**



आपल्या प्रजासत्ताकाच्या प्रवासात काही टप्पे असे असतात, जे भौगोलिक नसून बौद्धिक दिशेचे निदर्शक ठरतात. आजचा काळ तसाच आहे. पर्यावरणीय जीवनशैलीचे प्रयोग असोत, स्थानिक उद्योगांचे पुनरुज्जीवन असो, शिक्षणातील पर्यायी रचना असोत किंवा आरोग्य व तंत्रज्ञान क्षेत्रातील नवकल्पना असोत, दक्षिणेकडील राज्यांनी विकासाच्या वेगळ्या शक्यता दाखवल्या आहेत. त्या केवळ आर्थिक नाहीत; त्या राजकीयही आहेत. याच पार्श्वभूमीवर तामिळनाडूने केंद्र-राज्य संबंधांवर उच्चस्तरीय समिती नेमून संघराज्यवादाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला. न्यायमूर्ती कुरियन जोसेफ यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेला अहवाल हा केवळ तांत्रिक सूचना-संच नाही; तो घटनात्मक पुनर्विचाराची मागणी आहे. १९६९-७१ मधील राजमन्नार समितीने जसा स्वायत्ततेचा मुद्दा पुढे आणला होता, तसाच धागा येथे दिसतो; मात्र आजची चिंता अधिक व्यापक आहे. भारतीय संविधानाच्या प्रारूपात केंद्रीकरणाची छटा स्पष्ट आहे. स्वातंत्र्योत्तर अस्थिरतेच्या भीतीतून आणि अखंडतेच्या काळजीतून ती आली. परंतु तो अपवादात्मक काळ होता. पुढील दशकांत प्रादेशिक पक्षांच्या उदयानंतर आणि आघाडी सरकारांच्या अनुभवातून संघराज्याचे संतुलन काही प्रमाणात पुनर्स्थापित झाले. दुर्दैवाने, त्या अनुभवाला घटनात्मक आधार मिळाला नाही. गेल्या दशकात मात्र सत्तेची पुन्हा एकाग्रता झाली आहे. धोरण, संस्था आणि प्रशासकीय पातळीवर एकाच दिशेने झुकणारी प्रवृत्ती दिसते. समितीचा मूलभूत युक्तिवाद साधा आहे: राज्यांवर विश्वास ठेवणारा संघराज्य कमकुवत नसतो. सहाय्यकतेचा आदर करणारी, स्थानिक स्वराज्य संस्थांना सामर्थ्य देणारी आणि सांस्कृतिक वैविध्याला मान्यता देणारी रचना ही लोकशाही अधिक सखोल करते. आदेशाने नव्हे तर संमतीने टिकणारी एकता अधिक दीर्घकाळ टिकते. एकरूपतेच्या आग्रहाऐवजी वाटाघाटींच्या प्रक्रियेतून निर्माण होणारे ऐक्य अधिक टिकाऊ असते. या दृष्टीने अहवालात काही ठोस प्रस्ताव आहेत. राज्यांच्या सीमांबाबत केंद्राचा एकतर्फी अधिकार मर्यादित करणे, राज्यांशी पुरेशा सल्लामसलतीशिवाय घटनादुरुस्ती टाळणे, शिक्षणासारखे विषय राज्यांच्या अखत्यारीत परत देणे आणि आरोग्य-शेतीतील अतिक्रमण रोखणे हे सर्व संघराज्यीय समतोलाचे उपाय आहेत. राज्यपालपदावरील मनमानीवर घटनात्मक संहिता आणणे आणि पक्षांतरविरोधी तरतुदीतील त्रुटी दूर करणे ही राजकीय आरोग्याची गरज आहे. मात्र प्रत्येक उपायाची रचना सूक्ष्म असावी; अन्यथा औषध रोगापेक्षा कठीण ठरेल. राजकीय प्रतिनिधित्वाच्या संदर्भात एकाच वेळी निवडणुकांची संकल्पना नाकारली गेली आहे. सीमांकनावरील स्थगिती प्रजननदर स्थिर होईपर्यंत राखण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या प्रश्नामागे सत्तासंतुलनाची भीती दडलेली आहे. लोकसंख्येच्या वाढीचा दंड कार्यक्षम राज्यांना आणि बक्षीस कमी कार्यक्षम राज्यांना मिळू नये, अशी भावना आहे. या भावनेला केवळ आकड्यांत उत्तर देता येणार नाही; त्यासाठी व्यापक राजकीय समज आवश्यक आहे. राजकोषीय पातळीवर महसूल वाटपाच्या यंत्रणेत बदल सुचविले आहेत. कररचनेतील गुंतागुंत आणि अनुदानांतील असमतोल यामुळे राज्यांची स्वायत्तता बाधित होते. महसूलवाटपाचे निकष अधिक पारदर्शक आणि तर्कसंगत असावेत, अशी मागणी आहे. संघराज्य हा केवळ अधिकारांचा नव्हे तर संसाधनांचा करार असतो, हे येथे अधोरेखित होते. सांस्कृतिक पातळीवरील प्रस्ताव विशेष लक्षवेधी आहेत. राष्ट्रीय एकतेसाठी भाषिक एकरूपता आवश्यक आहे, हा गैरसमज अजूनही दृढ आहे. विविध भाषांचा सन्मान राखूनही राजकीय एकता साधता येते, हे भारतीय अनुभवाने दाखवले आहे. तथापि, एका भाषेच्या वर्चस्वाला विरोध करताना दुसऱ्या भाषेचे सर्वव्यापीकरण सुचविणे ही विसंगती ठरू शकते. भारतीय भाषांना समान स्तरावर स्थान देणारी भूमिका अधिक सुसंगत ठरेल. या संपूर्ण चर्चेचा गाभा केवळ कायदेशीर नाही; तो तात्त्विक आहे. भारतीय परंपरेत संदर्भानुसार नैतिक विचार करण्याची प्रवृत्ती आहे. देशाचार, स्थानिक रीतिरिवाज आणि पद्धती यांचा आदर ही शासनव्यवस्थेची दीर्घ परंपरा आहे. मौर्य, गुप्त, मुघल किंवा ब्रिटिश कोणत्याही सत्तेला उपखंडातील विविधतेचा स्वीकार करावाच लागला. भारताची रचना ही घटक प्रदेशांतून निर्माण होणारी आहे; वरून लादली जाणारी नाही. आज आवश्यक आहे तो नव्या संघराज्य कराराचा स्पष्ट संवाद. हिंदी आणि बिगर हिंदी राज्यांतील सत्तासंतुलन, प्रतिनिधित्व आणि संसाधनवाटप यांवर उघड चर्चा हवी. भाषिक लादणूक होणार नाही आणि राजकीय प्रतिनिधित्वात अचानक बदल होणार नाही, याची हमी एका बाजूने; तर महसुली वाटपात न्याय राखण्याची तयारी दुसऱ्या बाजूने अशा परस्पर संमतीतून पुढचा मार्ग निघू शकतो. राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक वर्चस्व टाळण्याचे तत्त्व हेच टिकाऊ प्रजासत्ताकाचे अधिष्ठान आहे. केंद्रीकरणाचा मोह तात्कालिक सुलभता देऊ शकतो; पण दीर्घकाळात तो असंतोष वाढवतो. वैविध्याला भीतीने नव्हे तर विश्वासाने सामोरे जाणे हीच खरी राष्ट्रीयता. दक्षिणेकडून सुरू झालेली ही चर्चा देशाच्या सर्व दिशांना पोहोचली, तरच आपल्या प्रजासत्ताकाचे दक्षिणायन उत्तरायणात रूपांतरित होईल.

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त अभिवादन

## “स्वच्छता हीच खरी सेवा”; उपमहापौर शर्मिला बाबर यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** थोर समाजसुधारक, कीर्तनकार आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे पुरस्कर्ते संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीत अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना बाबर म्हणाल्या की, संत गाडगेबाबांनी स्वच्छता हीच खरी सेवा मानून आयुष्यभर समाजप्रबोधनाचे कार्य केले. अंधश्रद्धा, अस्वच्छता आणि सामाजिक वाईट प्रथांविरुद्ध त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या विचारांचा आदर्श घेत आजच्या काळात स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

त्या पुढे म्हणाल्या, “समाजात सकारात्मक बदल घडवायचा असेल, तर संत गाडगेबाबांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची जाणीव हीच त्यांच्या कार्याची खरी शिकवण आहे.” या प्रसंगी नगरसदस्य अनुराधा गोरखे, उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते यशवंत कन्हेरे, विशाल जाधव, निखील दळवी, मुरलीधर दळवी, अर्थव साईकर, सुधीर जमदाडे, आकाश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. महापालिका कर्मचारी व नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमादरम्यान संत गाडगेबाबांनी स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केलेल्या कार्याची आठवण जागवण्यात आली. त्यांच्या कीर्तनातून समाजात समता, बंधुता आणि स्वच्छतेचा संदेश पोहोचला. ग्रामीण भागात फिरून त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वतः प्रत्यक्ष झाडू हाती घेऊन आदर्श निर्माण केला, ही बाब उपस्थितांनी विशेषत्वाने अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या शेवटी संत गाडगेबाबांच्या विचारांचा आदर्श ठेवून समाजात स्वच्छता राखणे, सामाजिक जबाबदारीची जाणीव जोपासणे आणि अंधश्रद्धेविरोधात ठाम भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# डॉ. राम पाटील यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ ‘अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन’कडून विशेष सत्कार**

**पिंपरी :** कॅन्सरग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक उपचारांसह मानसिक आधार देत माणुसकीची जपणूक करणारे केअर क्युब कॅन्सर सेंटरचे डायरेक्टर डॉ. राम पाटील यांचा अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (AMS) यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

“यश केवळ पदव्यांनी नव्हे, तर रुग्णांच्या डोळ्यांतील समाधानाने मिळते,” या विचारांना साजेसे कार्य डॉ. पाटील यांनी उभे केले आहे.

कॅन्सरग्रस्त रुग्णांना योग्य मार्गदर्शन, आधुनिक उपचारपद्धती आणि भावनिक आधार देत त्यांनी अनेक कुटुंबांना नवजीवन दिले आहे. त्यांच्या या निस्वार्थ सेवाभावी वृत्तीची दखल घेत फाउंडेशनतर्फे त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन गौरविण्यात आले.

याच कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री भरणे (मामा) यांच्या पत्नी सौ. सारिकाताई दत्तात्रय भरणे (मामी) यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांनाही शिवप्रतिमा प्रदान करण्यात आली. या वेळी फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा झाली.

सौ. सारिकाताई भरणे यांनी फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक करत भविष्यात पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास निलेश काळे, राहुल पवार, पूनम दाबेकर, संदीप निकम, वसंतराव पाटील यांच्यासह अनेक शिवप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोरवाडी चौकात ‘ग्रेड सेपरेटर’मध्ये कंटेनर अडकल्याने वाहतूक कोंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोरवाडी चौक परिसरात मंगळवारी (दि.२४) सकाळी ‘ग्रेड सेपरेटर’मध्ये उंची मर्यादेपेक्षा जास्त असलेला कंटेनर अडकल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. सकाळच्या गर्दीच्या वेळी ही घटना घडल्याने नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर ग्रेड सेपरेटरखाली जात असताना अडकला. त्यामुळे मोरवाडी चौकातून नाशिक फाटा आणि चिंचवड गावकडे जाणारी वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली. काही मिनिटांतच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या सहाय्याने अडकलेला कंटेनर बाहेर काढण्याचे काम हाती घेण्यात आले. दरम्यान, पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात आली; मात्र कोंडी पूर्णपणे सुरळीत होण्यासाठी सुमारे एक ते दीड तास लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

या घटनेनंतर ग्रेड सेपरेटरखालील उंची मर्यादा आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित विभागाने स्पष्ट सूचना फलक लावावेत आणि गर्दीच्या वेळी अवजड वाहनांवर निर्बंध आणावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# येरवड्यात आगीचे रौद्ररूप; ७०हून अधिक वाहने जळून खाक

## गोवऱ्यांमुळे भडका वाढला; सरकारी वाहनांचा समावेश, मालकीबाबत संभ्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**येरवडा :** येरवडा जेल रस्त्यावरील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाशेजारील मोकळ्या जागेत सोमवारी दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागून ७०हून अधिक दुचाकी व चारचाकी वाहने जळून खाक झाली. दुचाकींच्या टाक्यांतील पेट्रोल-ऑइल आणि वाहनांच्या आजूबाजूला थापलेल्या गोवऱ्यांमुळे आगीने क्षणात रौद्ररूप धारण केले. आगीचे उंच लोट दूरवरून दिसत होते.

सरकारी बंगला क्रमांक पाच परिसरात अनेक वर्षांपासून जप्त व भंगारातील वाहने उभी होती. स्थानिकांकडून त्या परिसरात गोवऱ्या थापल्या जात असल्याने आगीचा वेग प्रचंड वाढल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आगीत पन्नासहून अधिक दुचाकी आणि सुमारे वीस चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले. काही वाहनांवर ‘महाराष्ट्र शासन’ असे लिहिलेले असल्याने सरकारी वाहनांचाही समावेश असल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच येरवडा, नायडू व धानोरी अग्निशमन केंद्रांच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन अधिकारी सोपानदेव पवार व जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. सुदैवाने जीवितहानी टळली.

दरम्यान, जळालेली वाहने नेमकी कोणत्या विभागाची याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

## प्रा. प्रशांत मोरे यांच्या काव्यसादरीकरणाने भावनिक पूर्णविराम

# छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाचा समारोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी:** राजमाता जिजाऊंच्या संस्कारातून स्वराज्याची पायाभरणी घडवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाच्या समारोपीय कार्यक्रमात झाला. लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या हृदयस्पर्शी काव्यसादरीकरणाने कार्यक्रमाला भावनिक पूर्णविराम मिळाला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १५ ते २१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शहरातील विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६ अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा समारोप चिंचवड येथील संभाजीनगर येथे पार पडला. महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

समारोप कार्यक्रमाला नगरसदस्या अनुराधा गोरखे, तुषार हिंगे, कुशाग्र कदम, माजी महापौर मंगला कदम तसेच उपायुक्त अण्णा बोदडे यांच्यासह साई किरण मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी साई किरण मित्र मंडळाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. स. ग. पाचपोळ यांच्या हंबरून वासराले चाटती जवा गाय, तवा मले तिच्यामंदी दिसती माझी माय या कवितेचे स्वतः सुरबद्ध केलेल्या चालीत सादरीकरण करत प्रा. प्रशांत मोरे यांनी वातावरण भारावून टाकले. त्यानंतर आईच्या त्याग, माया, संघर्ष आणि निस्सीम प्रेम यांचे विविध पैलू उलगडणाऱ्या कविता त्यांनी सादर केल्या.

माय तान्ह्या लेकराला सत्य सांगे जिजाबाई, देवा शिवबा नावाची जन्मा आली हो नवलाई, तुझ्यामुळे या जन्माला खरा अर्थ मिळाला, नाहीतर माझा श्वासही व्यर्थच राहिला, जात्यामध्ये धान्य नाही तरीही माय ओढायची, डोळ्यामध्ये पाणी नाही तरी माय रडायची, बाप शिवाराचा धनी माय शिवाराची राणी अशा ओळींमधून त्यांनी मातृत्वाची कणखरता आणि लेकराच्या जडणघडणीत आईची भूमिका प्रभावीपणे मांडली.

काव्यसादरीकरणातून जिजाऊंच्या संस्कारांची ज्योत आणि शिवरायांच्या कर्तृत्वाचा विचार अधोरेखित करत मातृत्व, संस्कार आणि राष्ट्रनिर्मिती यांचा संगम उपस्थितांना अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी उभे राहून कवींचे स्वागत केले. विचार प्रबोधन पर्वाच्या या समारोपीय कार्यक्रमाने नागरिकांना छत्रपतींच्या विचारांचा वारसा जपण्याची आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.

# पुण्यात ‘द रुट्स स्पा’वर पोलिसांचा छापा; उडी मारलेल्या महिलेचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** विमाननगर परिसरातील ‘द रुट्स स्पा’ सेंटरवर विमानतळ पोलिसांनी रविवारी दुपारी सुमारे तीनच्या सुमारास छापा टाकला. कारवाई सुरू असतानाच अटकेच्या भीतीने महिला कर्मचारी आणि स्पा सेंटरच्या व्यवस्थापकाने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील खिडकीतून उडी मारत पळून जाण्याचा प्रयत्न केला. या धक्कादायक प्रकारात महिलेचा मृत्यू झाला असून व्यवस्थापक गंभीर जखमी झाला आहे.

उडी मारल्यानंतर दोघांनाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच महिलेचा मृत्यू झाला. व्यवस्थापकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून स्पा सेंटरचा कारभार, परवाने, कर्मचारी नोंदी आणि इतर कागदपत्रांची तपासणी सुरू केली आहे. या स्पामध्ये बेकायदा देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांना मिळाल्या होत्या. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. संबंधित व्यवस्थापक व मालकाविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मृत महिलेची ओळख पटविण्याचे काम सुरू असून तिच्या मृत्यूची नोंद अपघाती मृत्यू म्हणून करण्यात येत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी दिली. प्रकरणाचा पुढील तपास विमानतळ पोलिसांकडून सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शिवजयंतीनिमित्त भव्य सायकल रॅली

**बनकरफाटा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त ओतूर सायकल ग्रुपच्या वतीने ओतूर ते शिवनेरी किल्ला अशी भव्य सायकल रॅली आयोजित करण्यात आली. चौथ्या वर्षी आयोजित या रॅलीत ८०० हून अधिक सायकलस्वार सहभागी झाले. "सायकल चालवा, तंदुरुस्त रहा आणि पर्यावरण वाचवा" असा संदेश देत रॅली उत्साहात पार पडली. सहभागींसाठी टी-शर्ट, मेडल्स व लकी ड्रॉद्वारे बक्षिसांचे वितरण करण्यात आले. स्थानिक मान्यवर, उद्योजक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### शिंगवे येथे जुळ्या सापांची प्रणयक्रीडा; नागरिकांमध्ये उत्सुकता



**पारगाव :** आंबेगाव तालुका मधील शिंगवे येथे सोमवारी दुपारी जुळ्या सापांची प्रणयक्रीडा पाहायला मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये कुतूहल निर्माण झाले. गावठाण ते गाढवे मळा मार्गावर दोन साप बराच वेळ एकमेकांत गुंतलेले दिसून आले. डॉ. विठ्ठल गाढवे यांनी हा दुर्मिळ नजारा मोबाईलमध्ये चित्रित केला. बातमी पसरताच नागरिकांनी सुरक्षित अंतर ठेवून हा प्रकार पाहिला. उन्हाळ्याच्या प्रारंभी सापांचा प्रजनन काळ सुरू होत असल्याने अशा घटना घडतात, असे जाणकारांनी सांगितले. नागरिकांनी घाबरून न जाता सापांना त्रास न देता सतर्कता बाळगावी, तसेच आवश्यक असल्यास वनविभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले.

## भवानीनगर येथे बंदला व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# विविध घटनांच्या निषेधार्थ व्यापारी एकवटले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**भवानीनगर :** भिगवण येथील युवतीच्या अपहरण प्रकरणाच्या तसेच बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ भवानीनगर-सणसर परिसरात पुकारण्यात आलेल्या बंदला व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मंगळवारी (दि. २४) दुपारी बारा वाजेपर्यंत संपूर्ण व्यापारपेठ बंद ठेवून संताप व्यक्त करण्यात आला.

विश्व हिंदू परिषदच्या वतीने या बंदचे आवाहन करण्यात आले होते. तालुका अध्यक्ष बजरंग रायते यांच्यासह आकाश पलंगे, सागर गुप्ते, किरण घोरपडे, प्रसाद जाधव, सोनू जाधव, अमोल धोत्रे, भूषण बोराटे, योगेश सावंत, अनिल गुप्ते, अभिजीत निंबाळकर, गणेश शितोळे, अमोल कोल्हे, मिथुन बारवकर आदी पदाधिकाऱ्यांनी सणसर ग्रामपंचायतीला निवेदन देत भवानीनगर व सणसर येथील व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते.

या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत भवानीनगर मुख्य बाजारपेठेसह बारामती-इंदापूर मार्गावरील भवानीनगर ते सणसरदरम्यानची सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली. सणसर गावातील व्यापाऱ्यांनीही स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवत घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. सकाळपासूनच बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळाला.

बंदच्या माध्यमातून संबंधित प्रकरणांतील आरोपींवर कठोर कारवाई करावी, महिलांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात तसेच 'लव्ह जिहाद' संदर्भात कडक कायदा करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत समाजात तीव्र नाराजी व्यक्त होत असून शासनाने ठोस भूमिका घ्यावी, असेही आंदोलकांनी नमूद केले.

दरम्यान, बंद शांततेत पार पडला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक पातळीवर खबरदारी घेण्यात आली होती. व्यापाऱ्यांनी स्वखुशीने दुकाने बंद ठेवत सामाजिक एकजूट दाखवून दिली.

## गहू काढणीला अवकाळीची काजळी; खेड तालुक्यात शेतकऱ्यांची धांदल



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** अवकाळी पावसाच्या सावटामुळे खेड तालुक्यातील रब्बी हंगामातील पिकांवर संकटाची छाया दाटली आहे. काढणीनंतर शेतात पडून असलेल्या गहू व ज्वारीच्या पिकांची मळणी करून धान्य व चारा सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकरी दिवस-रात्र झटत आहेत. अचानक बदललेल्या हवामानामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यात पाण्याच्या उपलब्धतेनुसार बटाटा व कांदा पिक घेतले जाते, तर कमी पाण्याच्या क्षेत्रात गहू, ज्वारी आणि मका यांसारखी धान्य व चारा पिके घेतली जातात. कांदा काढणी अंतिम टप्प्यात असली तरी बाजारभाव नसल्याने काढलेला कांदा शेतात झाकून ठेवावा लागत आहे. दरम्यान, गहू व ज्वारीची काढणी पूर्ण झालेल्या अनेक शेतकऱ्यांची मळणी अद्याप बाकी आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्याने पावसाची शक्यता वर्तवली जात आहे. पाऊस झाल्यास भिजलेले धान्य खराब होण्याची आणि वर्षभराचा साठा वाया जाण्याची भीती आहे. तसेच ओला चारा काळवंडून जनावरांच्या खाण्यास अयोग्य ठरू शकतो, अशी चिंता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

मजुरांची कमतरता आणि काढणीच्या कामांचा ताण यामुळे शेतकरी कुटुंबे पहाटेपासून रात्रीपर्यंत शेतात राबत आहेत. पुढील आठवडा-दहा दिवस धान्य साठवणुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे.

## राष्ट्रसंत गाडगे महाराजांची १५० वी जयंती उत्साहात साजरी

### गाडगे महाराज शिक्षण संकुलात विचारजागर; स्वच्छता व मानवसेवेचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त गाडगे महाराज शिक्षण संकुल येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ही माहिती गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली.

कार्यक्रमाच्या विचारमंचावर ह.भ.प. सर्जेराव महाराज गाढवे, हरीशेठ पटेल, पांडुरंग ढोबळे, बबन तांबे, वसंत आप्पा डुंबरे, दत्तात्रय डुंबरे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य नितीन पाटील, अरुण वाकचौरे तसेच माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक बाबुलाल थोरात, प्राथमिक आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका सुमन घाडगे, शिक्षक प्रतिनिधी मनीषा ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

ह.भ.प. सर्जेराव महाराज गाढवे यांनी आपल्या मनोगतात गाडगेबाबांच्या विचारांचा जागर होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. "मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा" हा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले. तहानलेल्यांना पाणी, अंध-पंगूंना औषधोपचार आणि निराधारांना आधार देणे हीच खरी जयंती साजरी करण्याची पद्धत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राजू ठोकळे यांनी गाडगे महाराजांचे वैचारिक संबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांसारख्या थोर व्यक्तींशी असल्याचा उल्लेख केला. अज्ञान व अंधश्रद्धेत बुडालेल्या समाजाला शिक्षण व विज्ञानाच्या माध्यमातून सावरण्याचे कार्य गाडगे महाराजांनी केले, असे त्यांनी सांगितले.

शिक्षक प्रतिनिधी मनीषा पाटील यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव येथे झाला असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य उभे केले, याची आठवण वक्त्यांनी करून दिली. कार्यक्रमात मीरा शिंदे यांनी गीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मिष्ठान्न वाटप करण्यात आले. प्रास्ताविक शोभा तांबे यांनी, सूत्रसंचालन रवींद्र अहिनवे यांनी केले. प्रशांत फल्ले यांनी गाडगेबाबांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता केली.

## मंचर बाजार समितीत हिरवी मिरची, लसणाला उच्चांकी दर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आज तरकारी शेतमालाची एकूण ७४४२ डाग इतकी आवक झाली. आवकेत घट झाल्याने काही भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाली असून हिरवी मिरची आणि लसणाला दहा किलोमागे तब्बल १००० रुपयांपर्यंत दर मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी दिली.

बाजार समितीत हिरवी मिरची (७२ डाग) २५० ते १००० रुपये, लसूण (२) ४५१ ते १००० रुपये, टोमॅटो (८०) १०० ते २५० रुपये, फ्लॉवर (२०५३) १० ते १२० रुपये, तर वटाणा (७१) १५० ते ३८० रुपये दराने विक्री झाला. गवार (१) ३५० रुपये, बीट (१९३८) २० ते ११० रुपये, घेवडा (४२) १५० ते ३५० रुपये, चवळी (३१) १३० ते ४६० रुपये, तर ढोबळी मिरची (१७८) १०० ते ४०० रुपये दराने विक्री झाली.

भेंडी (६३) ३०० ते ४८० रुपये, फरशी (९३) ५० ते ३५० रुपये, तोंडली (१२) १०० ते ४३० रुपये, काकडी (५६६) २० ते १२० रुपये, वांगी (२०१) २० ते १५० रुपये, दुधी भोपळा (४९) ४० ते २०० रुपये असे दर नोंदवले गेले. आले (७२) १०० ते ५०१ रुपये, मका (१७७) ५० ते १५० रुपये, वालवड (२५) १६० ते २७० रुपये, राजमा (२८) १०० ते ५०० रुपये, पापडी (१९) १०० ते ३०० रुपये, गाजर (४५) २० ते १५० रुपये असे दर मिळाले.

बटाटा (७६४) २० ते १३० रुपये, कोबी (७१०) २० ते ८० रुपये, काळा वाल (५) ६१० रुपये, लिंबू (८) १०० ते ६४० रुपये, तुर (१) ३०० रुपये, पावटा (७) २५० ते ७५० रुपये, शेवगा (२२) २२० ते ५२० रुपये दराने विक्री झाला.

तरकारीच्या आवकेत घट झाल्याने बाजारभावात किंचित वाढ झाल्याचे उपसभापती सचिन पानसरे यांनी सांगितले.

## शिवजयंती महोत्सव २०२६ मध्ये चैतन्य विद्यालयाची बाजी

विविध स्पर्धांत सर्वाधिक पारितोषिके; विद्यार्थ्यांचा घवघवीत यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** पुणे जिल्हा परिषद, पंचायत समिती जुन्नर, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि तहसील कार्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान जुन्नर येथे आयोजित शिवजयंती महोत्सवातील विविध स्पर्धांत चैतन्य विद्यालय ओतूरच्या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक पारितोषिके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. ही माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

महोत्सवानिमित्त चित्रकला, निबंध, वक्तृत्व, गडचढण तसेच सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांत चैतन्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत घवघवीत यश मिळविले. चित्रकला स्पर्धेच्या मध्यम गटात (इयत्ता ५वी ते ८वी) नचिकेत प्रदीप सूर्यवंशी याने प्रथम, तर आरुष संतोष कांबळे याने तृतीय क्रमांक पटकावला. निबंध स्पर्धेच्या मोठ्या गटात (९वी ते १२वी) पलक रामदास डोंगरे हिने प्रथम, तर श्रीश अमित डुंबरे याने द्वितीय क्रमांक मिळविला. मध्यम गटात वरद रामदास डोंगरे याने द्वितीय, तर शर्वरी गणेश जगताप हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

गडचढण स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. लहान गटात (मुले) चिराग वसंत पवार द्वितीय, अजित गणेश ढमाले चतुर्थ; मोठ्या गटात (मुले) प्रदीप प्रकाश पोगाके द्वितीय, दर्शन रमेश पवार चतुर्थ ठरले. मोठ्या गटातील मुलींमध्ये वैष्णवी अमोल ठिकेकर हिने प्रथम, तर दूर्वा भगवान पोटे हिने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे, यश मस्करे आणि सचिन मुळे यांच्या हस्ते सन्मानचिन्हे, प्रशस्तिपत्रक व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे व पदाधिकाऱ्यांसह सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## राजगुरुनगरात संत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी

**राजगुरुनगर :** संत गाडगे महाराज यांची जयंती शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. नगर परिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते गाडगे महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी गाडगे महाराजांनी केलेल्या कार्याचा गौरव केला. "स्वच्छता हीच खरी सेवा" हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा असल्याचे सांगत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन करण्यात आले. उपनगराध्यक्ष, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## तळेगाव ढमढेरे येथील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ!

### विविध स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**तळेगाव ढमढेरे :** शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. शैक्षणिक वर्षात विविध स्पर्धा, उपक्रम आणि परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी, "देशातील प्रत्येक युवक सर्वार्थाने सक्षम आहे. या युवाशक्तीची ऊर्जा सकारात्मक कार्यासाठी वापरणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतांचा विकास करत समाजाभिमुख दृष्टी ठेवावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या सहकारी बँकेचे संचालक महेशबापू ढमढेरे होते. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्रीकांत सातपुते, ज्येष्ठ संचालक विजय ढमढेरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अर्जुन मुसमाडे तसेच विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ. रवींद्र भगत आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अर्जुन मुसमाडे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सहशालेय प्रगतीचा आढावा घेतला. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी वार्षिक अहवाल सादर करत वर्षभरातील विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. शाकूराव कोरडे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. रवींद्र भगत यांनी आभार प्रदर्शन केले.

## १९७१ च्या माजी विद्यार्थ्यांचा समाजोपयोगी उपक्रम; पर्यावरण संवर्धनासह सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम

# वळतीतील 'मैत्री पार्क' अबालवृद्धांसाठी ठरतेय आदर्श विरंगुळा केंद्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** वळती (ता. आंबेगाव) येथील 'मैत्री पार्क' आज गावकऱ्यांसाठी केवळ उद्यान नसून एकात्मता, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक जाणीवेचे प्रतीक ठरत आहे. सन १९७१ च्या इयत्ता पहिलीच्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील मैत्रीचे बंध जपत समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण कार्य करावे या भावनेतून या पार्कची उभारणी केली. त्यांच्या या उपक्रमामुळे गावाच्या सौंदर्यात भर पडली असून अबालवृद्धांसाठी हे ठिकाण खऱ्या अर्थाने विरंगुळा केंद्र बनले आहे.

माजी विद्यार्थ्यांनी स्वखर्चातून आणि श्रमदानाच्या माध्यमातून 'मैत्री पार्क' साकारले. कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय उभे राहिलेले हे उद्यान सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारे ठरले आहे. पार्कमध्ये तुळस, आंबा, आवळा, कडुनिंब, अश्वगंधा यांसारख्या औषधी व उपयुक्त वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. त्यामुळे परिसर हिरवागार, सुगंधित आणि आरोग्यदायी झाला आहे.

हिरवळीवर बसण्यासाठी बाकांची व्यवस्था करण्यात आली असून सकाळ-संध्याकाळ ग्रामस्थ येथे फेरफटका मारताना, व्यायाम करताना किंवा निवांत गप्पा मारताना दिसतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी हे ठिकाण विरंगुळ्याचे आणि मानसिक समाधानाचे केंद्र ठरले आहे.

मीना नदी तीरावर वसलेले हे पार्क नैसर्गिक सौंदर्याने नटलेले आहे. नदीकाठची शांतता, स्वच्छ हवा आणि हिरवाई यामुळे येथे येणाऱ्यांना मनःशांतीचा अनुभव मिळतो.

लहान मुलांसाठी खेळण्याची मोकळी जागा उपलब्ध असल्याने त्यांचा आनंद द्विगुणित झाला आहे. तरुणांसाठी संवाद, व्यायाम आणि सामाजिक भेटीगाठींचे हे केंद्र बनले आहे.

महिलांसाठीही हा परिसर सुरक्षित आणि आनंददायी असल्याने सकाळी व संध्याकाळी मोठी वर्दळ असते.

गावातील सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा सामाजिक उपक्रमांसाठीही 'मैत्री पार्क' उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये परस्पर संवाद वाढून सामाजिक सलोखा अधिक दृढ होत आहे.

पर्यावरण संवर्धनाबरोबरच सामाजिक एकात्मता वाढवण्याचे काम या उपक्रमातून होत आहे. शालेय जीवनातील मैत्रीचे बंध जपत समाजासाठी काहीतरी देण्याचा आदर्श १९७१ च्या माजी विद्यार्थ्यांनी घालून दिला आहे. एकंदरीतच, वळतीतील 'मैत्री पार्क' हे गावाच्या एकोप्याचे, सकारात्मक विचारांचे आणि पर्यावरणप्रेमाचे जिवंत प्रतीक बनले आहे.

## खेड तालुक्यातील युवकाचे पुस्तकांत अर्धशतक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** ढोरे भांबुरवाडी (ता. खेड) येथील शेतकरी कुटुंबातील युवक गौतम बाबुराव कोतवाल यांनी साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करत ५५ हून अधिक पुस्तके प्रकाशित करण्याचा मान मिळवला आहे. वाणिज्य शाखेत प्रावीण्य मिळवून बँकिंग क्षेत्रात एमबीए पदवी घेतलेल्या कोतवाल यांनी कोणताही औपचारिक साहित्य वारसा नसताना केवळ जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर लेखनविश्वात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या पुस्तकांमध्ये उद्योजक, आयएएस-आयपीएस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या प्रेरणादायी यशोगाथांचा समावेश आहे. ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशनच्या माध्यमातून त्यांनी १५०० हून अधिक यशस्वी व्यक्तींच्या कथा वाचकांपर्यंत पोहोचवल्या आहेत. त्यांच्या लेखनातून तरुणांना सकारात्मक दिशा व प्रेरणा मिळत आहे.

कोतवाल यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करावे, अशी मागणी साहित्यप्रेमी व नागरिकांकडून होत आहे. स्थानिक पातळीवर ठराव करून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची तयारी सुरू असून, या स्वयंप्रेरित लेखकाच्या कार्याचा योग्य सन्मान व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सारांश वृत्त

### सरकारी नोकरीच्या इच्छुकांची निदर्शने

**धारवाड (कर्नाटक):** धारवाडमध्ये नोकरी इच्छुकांचे निदर्शने तीव्र झाली, निदर्शकांनी रिक्त सरकारी पदे लवकरात लवकर भरण्याची मागणी केली. भरती प्रक्रियेत होणाऱ्या विलंबाबद्दल घोषणाबाजी करत आणि संताप व्यक्त करत मोठ्या संख्येने इच्छुक घटनास्थळी जमले. त्यांनी कर्नाटकच्या मंत्र्यांचा पुतळा जाळला.



### तीन रेल्वे प्रकल्पांना मंत्रिमंडळाची मंजुरी

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारांवरील मंत्रिमंडळ समितीने मंगळवारी रेल्वे मंत्रालयाच्या तीन प्रकल्पांना मंजुरी दिली, ज्यांची एकूण किंमत अंदाजे ९,०७२ कोटी रुपये आहे. या तीन प्रकल्पांमध्ये गोंदिया-जबलपूर विभागाचे दुहेरीकरण आणि पुनर्ख-क्युल आणि गमहरिया-चांदिल विभागांमधील तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाचे बांधकाम समाविष्ट आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंडमधील आठ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचे विद्यमान जाळे सुमारे ३०७ किमीने वाढेल, असे सरकारने म्हटले आहे.




### मुलाची हत्या, ७ अल्पवयीन ताब्यात

**शिवमोग्गा:** येथील सुलेबैलू येथील एका सरकारी शाळेबाहेर एका १६ वर्षीय मुलाची हत्या करण्यात आल्याने परिसरात तणाव निर्माण झाला आहे, असे पोलिसांनी मंगळवारी सांगितले. या घटनेनंतर शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. उरागादूरू येथील सरकारी हायस्कूलमध्ये एसएसएलसीचा विद्यार्थी संकेत (१६) परीक्षेपूर्वी एका विशेष वर्गात गेल्यानंतर ही घटना घडली.

## सेवा तीर्थातील पहिली कॅबिनेट बैठक ठरणार ऐतिहासिक

# ‘केरळ’चे ‘केरळम’ नामकरणाचा प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत केरळ राज्याचे नाव बदलण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बैठकीपूर्वी केंद्रीय मंत्र्यांना लवकर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, विशेष फोटो सेशनचे आयोजन करण्यात आले आहे. नव्या ‘सेवा तीर्थ’ अर्थात पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) आणि कॅबिनेट सचिवालयाच्या इमारतीत होणारी ही पहिली कॅबिनेट बैठक ठरणार असल्याने या बैठकीला प्रतीकात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे.



केरळ विधानसभेने ऑगस्ट २०२३ मध्ये एकमताने ठराव मंजूर करून राज्याचे अधिकृत नाव ‘केरळ’ऐवजी ‘केरळम’ करण्याची विनंती केंद्र सरकारकडे केली होती. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी हा प्रस्ताव राज्यघटनेच्या कलम ३ अंतर्गत मांडला.

त्यांच्या मते, ‘केरळम’ हा शब्द मल्याळम भाषेतील मूळ आणि सांस्कृतिक ओळख दर्शवणारा आहे. राज्यातील मल्याळम भाषिक समाजाची एकात्मता आणि ऐतिहासिक परंपरा प्रतिबिंबित करण्यासाठी हे नाव अधिक योग्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३ नुसार, कोणत्याही राज्याचे नाव बदलण्यासाठी संसदेला कायदा करावा लागतो. त्याआधी राष्ट्रपती संबंधित प्रस्ताव संबंधित राज्य विधानसभेकडे अभिप्रायासाठी पाठवतात. मात्र अंतिम अधिकार संसदेकडेच असतो.

राज्यघटनेच्या पहिल्या अनुसूचीत राज्यांची नावे नमूद आहेत. ‘केरळ’ऐवजी ‘केरळम’ असा बदल करण्यासाठी घटनादुरुस्ती नव्हे, तर संसदीय कायद्याद्वारे अनुसूचीत दुरुस्ती करावी लागेल. तसेच आठव्या अनुसूचीत नमूद असलेल्या सर्व अधिकृत भाषांमध्येही नावाचा सुसंगत बदल करणे अपेक्षित आहे.

राज्याचे नाव स्थानिक भाषेतील स्वरूपात अधिकृत करण्याची प्रवृत्ती अलीकडच्या काळात वाढलेली दिसते. ‘ओडिशा’ (पूर्वीचे ओरिसा) किंवा ‘चेन्नई’ (पूर्वीचे मद्रास) यांसारखी उदाहरणे यापूर्वी घडली आहेत. ‘केरळम’ हा बदल भाषिक अस्मिता आणि सांस्कृतिक स्वायत्ततेचा भाग म्हणून मांडला जात आहे. तथापि, नावबदलाच्या प्रक्रियेत प्रशासकीय खर्च, अधिकृत कागदपत्रे, नकाशे, शासकीय संकेतस्थळे आणि आंतरराष्ट्रीय संदर्भांतील बदल यांसारखे व्यावहारिक मुद्देही विचारात घ्यावे लागतील.

नव्या प्रशासकीय संकुलात ‘सेवा तीर्थ’ येथे होणारी ही पहिली कॅबिनेट बैठक असल्याने या निर्णयाला प्रतीकात्मक वजन लाभू शकते. केंद्र सरकार राज्याच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत असल्याचा संदेश या निर्णयातून जाऊ शकतो. आता मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर संसदेत विधेयक सादर होईल का, आणि त्या प्रक्रियेला किती वेळ लागेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. राज्य आणि केंद्र यांच्यातील सहकार्याच्या चौकटीत हा प्रस्ताव पुढे सरकतो की नव्या वादाला तोंड फुटते, हे आगामी घडामोडींवर अवलंबून असेल.

## प्रमाणपत्रासाठी आधी धर्मत्याग आवश्यक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मदुराई** : ‘जात नाही, धर्म नाही’ असे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संबंधित व्यक्तीने आधी औपचारिकरीत्या आपल्या धर्माचा त्याग केलेला असणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करत मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने धर्माचा उल्लेख नसलेले प्रमाणपत्र देण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली.

आई-वडील हिंदू धर्माचे असतानाही आपल्याला जात किंवा धर्माचा उल्लेख नसलेले प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी करत याचिकाकर्त्याने न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती आर. रामास्वामी यांच्या एकलपीठासमोर झाली. न्यायालयाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५चा संदर्भ देत, व्यक्तीला धर्म स्वीकारण्यासोबतच धर्मत्याग करण्याचाही अधिकार असल्याचे नमूद केले. मात्र, केवळ वैयक्तिक समजुतीच्या आधारे धर्माचा उल्लेख नसलेले प्रमाणपत्र देणे शक्य नसून, त्यासाठी धर्मत्याग स्पष्टपणे आणि औपचारिक स्वरूपात नोंदवलेला असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. याचिकाकर्त्याने आपण धर्मत्याग केलेला नाही, असे मान्य केले.

न्यायमूर्ती रामास्वामी यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत संबंधित व्यक्ती हिंदू धर्माच्या रूढ पद्धतीनुसार किंवा कायदेशीर प्रक्रियेद्वारे आपला धर्म सोडत नाही, तोपर्यंत ‘जात नाही, धर्म नाही’ असे प्रमाणपत्र देण्याच्या मागणीवर विचार होऊ शकत नाही.

धर्मत्यागाचा कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नसल्याने तहसीलदारांचा आदेश रद्द करण्यास न्यायालयाने नकार दिला आणि रिट याचिका फेटाळून लावली. मात्र, याचिकाकर्त्याला भविष्यात औपचारिकरीत्या धर्मत्याग करून त्याचा पुरावा सादर केल्यास, नव्याने अर्ज करण्याचे स्वातंत्र्य असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## युनूस यांनी नियमांचे केले उल्लंघन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका** : बांगलादेशमध्ये सरकार बदलल्यानंतर राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी केलेल्या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यांनी माजी मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्यावर संवैधानिक नियमांचे उल्लंघन केल्याचा आणि जवळपास दीड वर्ष महत्त्वाच्या निर्णयांपासून त्यांना दूर ठेवल्याचा आरोप केला आहे.

राष्ट्रपती शहाबुद्दीन यांनी बांगलादेशातील वृत्तपत्र कालेर कंथो यांना दिलेल्या मुलाखतीत हा दावा केला. “अंतरिम सरकारच्या काळात अनेक अध्यादेश जारी करण्यात आले, जे अनावश्यक होते. त्या संदर्भात माझा सल्लाही घेण्यात आला नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले.

संवैधानिक प्रक्रियेचा उल्लेख करत शहाबुद्दीन म्हणाले की, मुख्य सल्लागाराने परदेश दौऱ्यानंतर राष्ट्रपतींना माहिती देणे आवश्यक असते. मात्र युनूस यांनी हा प्रघात पाळला नाही. त्यांनी अंदाजे १५ परदेश दौरे केले, परंतु त्याबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नाही, असा आरोप राष्ट्रपतींनी केला. “मला अंधारात ठेवण्यात आले,” असे म्हणत शहाबुद्दीन यांनी बांगलादेश-अमेरिका व्यापार करारासारख्या महत्त्वाच्या विषयांवरही माहिती देण्यात आली नसल्याचा दावा केला. राष्ट्रपतींच्या संवैधानिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि देशाशी संबंधित अनेक निर्णयांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले, असे ते म्हणाले.

याशिवाय परदेशातील बांगलादेशी दूतावासांमधून राष्ट्रपतींचे छायाचित्र काढून टाकण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. यामुळे त्यांच्या पदाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न झाल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रपतींच्या या आरोपांमुळे ढाक्यात राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## इस्रोच्या अपयशांवर उच्चस्तरीय चौकशी समिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरू** : इस्रोच्या ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहन मोहिमांतील सलग अपयशांनंतर केंद्र सरकारने उच्चस्तरीय विशेष चौकशी समिती स्थापन केली आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्या अलीकडील विक्रम साराभाई अंतराळ केंद्र भेटीनंतर या प्रकरणाला वेग आला आहे.

माजी प्रमुख वैज्ञानिक सल्लागार के विजय राघवन आणि इस्रोचे माजी अध्यक्ष एस सोमनाथ यांचा समावेश असलेली ही समिती ‘सिस्टमिक’ आणि संघटनात्मक त्रुटींची सखोल चौकशी करणार आहे. एप्रिलपूर्वी समितीचा अहवाल इस्रोचे विद्यमान अध्यक्ष व्ही. नारायणन यांना सादर केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

१२ जानेवारी रोजी झालेल्या पीएसएलव्ही-सी६२ मोहिमेत १६ उपग्रह कक्षेत स्थापित करण्यात अपयश आले. रॉकेटचा तिसरा टप्पा प्रज्वलित न झाल्याने प्रक्षेपण अपूर्ण राहिले आणि वाहन समुद्रात कोसळले. त्याआधी १८ मे २०२५ रोजी पीएसएलव्ही-सी६१ मोहिमेतही तिसऱ्या टप्प्यातील बिघाडामुळे सरकारच्या धोरणात्मक गरजांसाठी विकसित उपग्रह नष्ट झाला होता. पीएसएलव्ही हा इस्रोचा सर्वाधिक विश्वासार्ह प्रक्षेपणवाहन मानला जातो. १९९३ पासून ९० टक्क्यांहून अधिक यशदर आणि सुमारे ३५० उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण अशी त्याची कामगिरी आहे. त्यामुळे सलग दोन अपयशांमुळे अंतराळ क्षेत्रात चिंता व्यक्त होत आहे.

साधारणपणे इस्रो ‘फेल्युअर ॲनालिसिस कमिटी’ स्थापन करून दोषपूर्ण घटकाची तपासणी करते. मात्र यावेळी केवळ तांत्रिक कारणांपुरते न राहता रॉकेट घटकांची निर्मिती, खरेदी प्रक्रिया, असेंब्ली आणि गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा यांचाही आढावा घेतला जाणार आहे. अंतराळ क्षेत्रात वाढत्या खाजगी सहभागाच्या पार्श्वभूमीवर जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रक्रियाही तपासल्या जाणार आहेत.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी स्पष्ट केले की इस्रोकडे स्वतः विश्लेषण करण्याचे पूर्ण कौशल्य आहे; मात्र यावेळी पारदर्शकता आणि भागधारकांचा विश्वास टिकवण्यासाठी तृतीय-पक्षीय मूल्यमापन केले जात आहे. समस्या पूर्णतः दूर झाल्यानंतर जूनमध्ये पुढील प्रक्षेपण करण्याची इस्रोची योजना आहे. या वर्षी एकूण १८ प्रक्षेपणांचे नियोजन असून त्यापैकी सहा खासगी क्षेत्रातील उपग्रहांचे आहेत.

## गोरखपूर एम्समधील निवासी डॉक्टरशी गैरवर्तन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गोरखपूर** : एम्स गोरखपूर येथे कार्यरत असलेल्या नागालँडमधील २५ वर्षीय निवासी डॉक्टरशी विनयभंग व वांशिक स्वरूपाच्या टिप्पणी केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केली असून तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, रविवारी संध्याकाळी संबंधित डॉक्टर खरेदीसाठी एका मॉलमध्ये गेली होती. परतताना मोटारसायकलवरून आलेल्या तिघांनी तिचा पाठलाग सुरू केला. मॉलपासून सुमारे १.५ किमी अंतरावर असलेल्या एम्सकडे ती परतत असताना आरोपींनी अश्लील टिप्पणी व शिवीगाळ केली. पीडितेच्या तक्रारीनुसार, एम्सच्या गेट क्रमांक २ जवळ आरोपींपैकी एकाने तिला अनुचित प्रकारे स्पर्श केला व अश्लील हावभाव केले. तिने आक्षेप घेत आरडाओरडा केल्यानंतर आरोपींनी गंभीर परिणामांची धमकी देत तेथून पळ काढला.

सोमवारी तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांचे पथक एम्समध्ये पोहोचले आणि पीडितेचा जबाब नोंदवला. गोरखपूरचे पोलिस अधीक्षक अभिनव त्यागी यांनी सांगितले की, “या प्रकरणात तीन जणांचा सहभाग आहे. दोघांना अटक करण्यात आली असून तिसऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी छापे टाकण्यात येत आहेत.”

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सूरज गुप्ता (२२) आणि अमृत विश्वकर्मा (२१) यांना ओळखून अटक करण्यात आली. हे दोघेही शेजारच्या देवरिया जिल्ह्यातील रहिवासी आहेत. आरोपींवर महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने हल्ला किंवा गुन्हेगारी बळाचा वापर, अश्लील कृत्ये, गुन्हेगारी धमकी आणि शांतता भंग करण्याचे आरोप नोंदवण्यात आले आहेत.

## पंतप्रधान मोदींचे बंगाल मतदारांना पत्र

# विकासाच्या संकल्पनेवर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : एप्रिलमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी पश्चिम बंगालमधील मतदारांना पत्र लिहून राज्याची सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन केले. पत्रातून त्यांनी राज्याच्या विकासाविषयीचा आपला दृष्टिकोन मांडत मतदान करताना पुढील पिढीच्या भविष्याचा विचार करण्याचे आवाहन केले आहे.

“जय माँ काली” या उद्गारांनी पत्राची सुरुवात करत पंतप्रधानांनी प्रशासन, पायाभूत सुविधा, शिक्षण आणि रोजगार क्षेत्रातील कथित तफावतींवर भाष्य केले. केंद्र सरकारच्या योजनांमुळे राज्याला अधिक वेगाने विकासाच्या मार्गावर नेता येईल, असा दावा त्यांनी केला. नागरिकत्व सुधारणा कायद्याद्वारे धार्मिक छळाला सामोरे जाणाऱ्या निर्वासितांना नागरिकत्व देण्याचा मुद्दाही त्यांनी अधोरेखित केला. पत्रात सत्ताधारी तृणमूल काँग्रेस किंवा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे नाव थेट घेतलेले नसले, तरी राज्यातील कथित गैरव्यवस्थापन, मतपेढीचे राजकारण आणि हिंसाचार यावर त्यांनी टीका केली. बंगालला “संकुचित राजकारण आणि अराजकतेच्या छायेत” ढकलले गेले असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पश्चिम बंगालच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख करत पंतप्रधानांनी स्वामी विवेकानंद आणि श्री अरबिंदो यांच्या कार्याचे स्मरण केले. औद्योगिकीकरणात अग्रणी असलेल्या राज्याची सध्याची स्थिती दुःखद असल्याचे त्यांनी नमूद केले. केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या कामगिरीचा उल्लेख करत त्यांनी विविध योजनांची आकडेवारी मांडली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ८५ लाख शौचालयांची उभारणी, लघु व्यापारी व उद्योजकांना २.८२ लाख कोटी रुपयांचे कर्ज, अटल पेन्शन योजनेअंतर्गत ५६ लाख लाभार्थी, उज्ज्वला योजनेतून १ कोटीहून अधिक गॅस जोडण्या तसेच पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत ५२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, महिलांसाठी सुरक्षित वातावरण आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देताना त्यांनी बेकायदेशीर घुसखोरी आणि केंद्रीय निधीच्या कथित गैरवापराबाबतही चिंता व्यक्त केली.

पत्राच्या शेवटी पंतप्रधानांनी श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या योगदानाचे स्मरण केले आणि पश्चिम बंगालच्या भवितव्यासाठी मतदारांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. राज्याच्या भविष्यासंबंधी अंतिम निर्णय मतदारच घेतील, असे स्पष्ट करत त्यांनी विकास आणि समृद्धीच्या दिशेने पुढे जाण्याचा संदेश दिला.

## बंगालमधील सहा जिल्हा न्यायालयांना बॉम्बची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये मंगळवारी दुपारी सहा जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोटाच्या धमकीचे ई-मेल प्राप्त झाल्याने न्यायालयीन यंत्रणा सतर्क झाली. तात्काळ न्यायालये रिकामी करून पोलिसांनी व्यापक शोधमोहीम राबवली. दुपारी दोन वाजेपर्यंत कोणताही स्फोटक पदार्थ आढळून न आल्याने ही धमकी बनावट असल्याचे स्पष्ट झाले.

धमकीचे ई-मेल कोलकाता येथील शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बँकशाल न्यायालय, तसेच आसनसोल, दुर्गापूर आणि बेरहमपूर येथील न्यायालयांना पाठवण्यात आले होते. ई-मेल मिळताच न्यायालयीन परिसरातील वकील, कर्मचारी आणि नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले.

पोलिसांनी तातडीने स्निफर डॉग, बॉम्ब निकामी पथके आणि स्थानिक सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी पाठवली. प्रत्येक न्यायालयात सखोल तपासणी करण्यात आली. प्राथमिक चौकशीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. तरीही खबरदारी म्हणून राज्यातील इतर न्यायालयांमध्येही सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

ही घटना त्या वेळी घडली, जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यात विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रिया सुरू आहे. मतदार याद्यांच्या पुनरावलोकनासंदर्भात निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर सुमारे २५० सेवारत व निवृत्त जिल्हास्तरीय न्यायाधीश या प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. राज्यातील सुमारे सहा कोटी मतदारांशी संबंधित दाव्यांची पडताळणी आणि त्रुटी दुरुस्ती हे या प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे.

दुर्गापूरचे जिल्हा न्यायाधीश देबप्रसाद नाथ यांनी सांगितले की, सुरक्षा प्रोटोकॉलनुसार न्यायालय रिकामे करण्यात आले असून धमकीत तथ्य आढळलेले नाही. दरम्यान, राज्याच्या मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती, पोलीस महासंचालक पियुष पांडे आणि कोलकाता पोलिस आयुक्त सुप्रतिम सरकार यांनी नबन्ना येथे बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी न्यायिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. एसआयआर प्रक्रियेवर या घटनेचा परिणाम होणार नसल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## पर्यटनाला चालना देण्यासाठी करार

**भुवनेश्वर** : पूर्व भारतातील एक प्रमुख साहसी पर्यटन केंद्र म्हणून राज्य विकसित करण्याच्या उद्देशाने ओडिशा सरकारने मंगळवारी इंडियन माउंटेनियरिंग फाउंडेशन आणि एअरो क्लब ऑफ इंडिया सोबत सामंजस्य करार केले. पर्यटन विभाग सांभाळणाऱ्या उपमुख्यमंत्री प्रवती परिदा यांच्या उपस्थितीत येथे हे सामंजस्य करार करण्यात आले. उपमुख्यमंत्री यांनी गो-ॲडव्हेंचर पोर्टल देखील लाँच केले. सुरक्षितता ही राज्याच्या साहसी पर्यटनाच्या विस्ताराची गुरुकिल्ली आहे.

## भारत मंडपममधील आंदोलन उदय भानू चीब अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्लीतील भारत मंडपम येथे २० फेब्रुवारी रोजी झालेल्या आंदोलनप्रकरणी दिल्ली पोलिसांनी इंडियन यूथ काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चीब यांना अटक केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार सोमवारी चौकशीनंतर त्यांना अधिकृतरित्या अटक करण्यात आली. या प्रकरणात अटक झालेल्यांची एकूण संख्या आता आठ झाली आहे.

या आधी सोमवारी जितेंद्र यादव, राजा गुजर आणि विमल अजय कुमार यांना ताब्यात घेण्यात आले होते. यादव हे ग्वाल्हेरचे रहिवासी असून युवा काँग्रेसचे राष्ट्रीय समन्वयक आहेत. राजा गुजर हे ग्वाल्हेर जिल्हाध्यक्ष, तर विमल अजय कुमार हे भिंड येथील पदाधिकारी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

एआय ग्लोबल समिटदरम्यान आयोजित ‘एआय इम्पॅक्ट एक्स्पो’मध्ये संबंधित कार्यकर्त्यांनी हॉलमध्ये शर्ट काढून आंदोलन केल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार आंदोलनकर्त्यांनी कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली ऑनलाईन नोंदणी क्यूआर कोडच्या माध्यमातून पूर्ण केली होती. ते कॅज्युअल वेशात कार्यक्रमस्थळी दाखल झाले होते. स्वेटर, जॅकेट आणि टी-शर्ट घालून ते हॉलमध्ये प्रवेशले. कार्यक्रमादरम्यान अचानक त्यांनी अंगावरील कपडे काढून पंतप्रधानांविरोधात घोषणाबाजी केली, असा आरोप आहे.

## आक्षेपांवर प्रक्रिया वेगवान करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

# पश्चिम बंगाल एसआयआर प्रक्रियेत ८० लाख दावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमधील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेतून उद्भवलेल्या सुमारे ८० लाख दावे आणि आक्षेपांच्या सुनावणीस गती देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वाचे निर्देश जारी केले.



मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची व विपुल एम. पंचोली यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या पत्राची दखल घेतली. सध्या नियुक्त २५० जिल्हा न्यायाधीशांना सर्व दावे-आक्षेप निकाली काढण्यासाठी सुमारे ८० दिवस लागतील, असे त्या पत्रात नमूद करण्यात आले होते.

प्रक्रियेला गती देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी न्यायाधीश तैनात करण्यास परवानगी दिली. तसेच कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना शेजारील झारखंड आणि ओडिसा येथील समकक्ष मुख्य न्यायाधीशांशी संपर्क साधून समतुल्य दर्जाचे कार्यरत किंवा माजी न्यायिक अधिकारी मागवण्याची मुभा दिली.

न्यायालयाने स्पष्ट केले की, जर अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासली तर संबंधित राज्यांतील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाऊ शकते. या अधिकाऱ्यांच्या तैनातीचा खर्च निवडणूक आयोगाने उचलेल, असेही आदेशात नमूद आहे.

२८ फेब्रुवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यास न्यायालयाने परवानगी दिली आहे. मात्र, ‘तार्किक विसंगती’ असलेल्या प्रकरणांची पडताळणी पूर्ण न झाल्यास, प्रक्रिया पूर्ण होताच पुरवणी यादी प्रसिद्ध करता येईल, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत विशेष अधिकार वापरत न्यायालयाने निर्देश दिले की, अशा पुरवणी यादीतील मतदारांना २८ फेब्रुवारीच्या अंतिम यादीचा भाग मानले जाईल. यामुळे निवडणूक प्रक्रियेतील वैधानिक सातत्य राखण्याचा प्रयत्न दिसून येतो.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी आक्षेप घेतला की झारखंड आणि ओडिशातील न्यायिक अधिकाऱ्यांना बंगाली भाषेचे पुरेसे ज्ञान नसल्यास प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. यावर न्यायालयाने ऐतिहासिक संदर्भ देत नमूद केले की झारखंड आणि ओडिशातील काही भाग पूर्वी बंगाल प्रांताचा हिस्सा होते. त्यामुळे भाषिक अडचणींचा प्रश्न निर्णायक ठरणार नाही, असा संकेत न्यायालयाने दिला.

या प्रकरणाची सुनावणी करताना खंडपीठाने पश्चिम बंगाल सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यातील “विश्वासाच्या अभावावर” टीका केली. “लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या” तृणमूल काँग्रेस सरकार आणि आयोगातील आरोप-प्रत्यारोप दुर्दैवी असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. २० फेब्रुवारी रोजी न्यायालयाने ही प्रक्रिया वेळेत पूर्ण व्हावी म्हणून विद्यमान आणि माजी जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे “असाधारण” निर्देश दिले होते. आता नव्या आदेशांमुळे एसआयआर प्रक्रियेला प्रशासनिक व न्यायिक पाठबळ मिळण्याची अपेक्षा आहे.